**Akshardhara Research Journal**
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
*E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume I*

**37**

# सेवांतर्गत शिक्षकांना शालेय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाच्या आवश्यकतेचा अभ्यास

**डॉ .स्वाती चव्हाण**
सहमार्गदर्शक
के .सी .ई.सोसायटीचे शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षण शास्त्र महाविद्यालय जळगाव

**डॉ.पंकजकुमार शांताराम नन्नवरे**
मार्गदर्शक, विभाग प्रमुख शिक्षणशास्त्र,
(बी .पी आर्टस् ,एस.एम .ए.सायन्स, के के.सी.कॉमर्स कॉलेज,चाळीसगाव,जि.जळगाव

**श्री.उत्तम धर्मा चव्हाण**
संशोधक विद्यार्थी
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ , जळगाव

---

**सारांश:-**

शिक्षणाचे विविध प्रकारचे पैलू आहेत जसे की ,पर्यावरण शिक्षण , शांततेसाठी शिक्षण ,मानवी हक्काचे शिक्षण ,मूल्यशिक्षण , लोक संख्या शिक्षण अजून एक महत्त्वाचा पैलू म्हणजे आपत्ती व्यवस्थापनाचे शिक्षण. या घटका विषयी अधिक माहिती गरजेचे आहे. याबाबतचे प्रशिक्षण प्रत्येक शिक्षकांना देणे गरजेचे आहे . आजचा विद्यार्थी हा देशाचा भावी नागरिक आहे . त्याला घडवणाऱ्या शिक्षकांना आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणाची आवश्यकता आहे का? याचा विचार करणे गरजेचे आहे. शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृती आहे. यामध्ये समाजातील विविध प्रकारचे घटक या ठिकाणी शिक्षण घेत असतात. प्रत्येक घटकाला जगण्याचा अधिकार आहे. यासाठी जीवित हानी होऊ नये म्हणून प्रयत्न करणे गरजेचे आहे . शाळेमध्ये येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांची सुरक्षितता राखणे हे महत्त्वाचे आहे . तरच विद्यार्थी हा शाळेमध्ये मोकळेपणाने अध्ययन करू शकतो. शिक्षकांना आतापर्यंत अभ्यासक्रम, मूल्यमापन तंत्रे,अध्ययन , अध्यापन ,माहिती संप्रेषण व तंत्रज्ञान इत्यादी घटकाचे प्रशिक्षण दिले जाते तसेच विविध प्रकारचे दिनविशेष,सप्ताह, पंध रवाडा कसा साजरा करावा यासंबंधी शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाते, परंतु आपत्तीचे प्रकार,आपत्ती आल्यावर कोणकोणत्या उपाययोजना कराव्यात याचे नियोजन कसे करावे? या सर्व बाबी संबंधित प्रत्येक स्तरावरील शिक्षक यांना शालेय आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे . या सर्व बाबींचा अभ्यास करण्याचा संशोधकांनी विचार केला आहे.

**कीवर्ड :-** शालेय आपत्ती व्यवस्थापन, शिक्षकप्रशिक्षण,नैसर्गिक आपत्ती, मानवनिर्मित आपत्ती, सुरक्षितता, भौतिक सुविधा, आपत्ती व्यवस्थापन घटक, आपत्ती व्यवस्थापन उपायोजना, शाळेतील मानवी घटक, प्रशिक्षणाची गरज.

**प्रस्तावना:-**

शाळेमध्ये विविध मानवी घटक असतात. विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, विविध कर्मचारी, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत कार्यरत कर्मचारी असतात.शालेय वातावरणात विविध प्रकारच्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती येत असतात . नैसर्गिक आपत्ती पुढील प्रमाणे - भूकंप,पूर, वादळ,वीज कोसळणे वणवा लागणे, दरड कोसळणे, वृक्ष उन्मळून पडणे, त्सुनामी , लाटा, थंडीची लाट,प्राण्यांचा हल्ला, दंश करणे, अति उष्मा, अतिवृष्टी इत्यादी मानव निर्मित आपत्ती पुढील प्रमाणे आहे – आग लागणे,अपघात, विजेचा धक्का बसणे,इमारत किंवा भिंत कोसळणे, बॉम्बस्फोट, चेंगराचेंगरी,विषबाधा, विद्यार्थी अपहरण, अचानक उद्भवणारे आजार - फिट चक्कर,अवयवाला होणारी दुखापत (मुख्याध्यापक मार्गदर्शिका भाग २ पेज नंबर ५९) आपत्ती घडू शकतात त्यामध्ये मोठ्या प्रमाणात जीवित , वित्त हानी होऊ शकतात काही आपत्ती वैयक्तिक व सामूहिक असतात जसे की सन २००४ मध्ये तामिळनाडू मधील कुंभकोणमच्या शाळेत झालेली दुर्घटना, अन्नातून होणारी विषबाधा कोविड-१९ शाळेत गर्दीमुळे होणारे चेंगराचेंगरी , शालेय इमारतीची पडझड , वर्गात विषारी किटक किंवा साप निघणे , महाराष्ट्रातील माळीण दुर्घटना २००४ ची त्सुनामी , सन २००९ मध्ये गुजरात राज्यात झालेल्या भूकंपामध्ये काही शालेय विद्यार्थी दगावले अशा कितीतरी घटना घडलेल्या आहेत यासारख्या घटनांना कसे सामोरे जायचे ? या संबंधीची माहिती शिक्षकांना असणे आवश्यक आहे .विद्यार्थी जवळ जवळ सहा तास शाळेत असतो . त्याच्या सुरक्षेची जबाबदारी देखील शाळेची आहे तहान लागल्या विहीर खोदण्यापेक्षा आधीच उपाययोजना करून ठेवणे महत्त्वाचे आहे. संकटे येण्याआधीच त्याचीचाहूल लागली तर त्यावर योग्य उपाययोजना करता येतात .त्यासाठी शिक्षकांमध्ये संकटाला सामोरे जाण्याची क्षमता,जाणीव, याबद्दल जागरूकता निर्माण होणे महत्त्वाचे आहे .त्यासाठी शिक्षकांना शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या बाबतीत कोणकोणत्या अडचणी येऊ शकतात? कोणकोणत्या शालेय आपत्ती येऊ शकतात? त्या सर्वांबद्दल शिक्षकांना माहिती असणे आवश्यक आहे.

**समस्येचे पार्श्वभूमी :-**

शाळेमध्ये विद्यार्थी असताना त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांच्यामध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होणे गरजेचे आहे. तरच मुले मुक्त व मन मोकळेपणाने शिकण्याचा आनंद घेऊ शकतात. त्यासाठी येणाऱ्या आपत्ती कशा

©Copyright 2024 *ADRJ*. All Rights Reserved

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume I

टाळाव्यात?त्यांची तीव्रता कशी कमी करावी ?त्यांचे पुनर्वसन कसे करावे ? याबद्दल शिक्षकांना माहिती असणे गरजेचे आहे.म्हणून शाळेतील शिक्षकांना शालेय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाची आवश्यकता वाटते.शालेय आपत्ती व्यवस्थापन आराखडा कसा तयार करावा?यापूर्वी शालेय स्तरावर आलेल्या आपत्ती कोणत्या? आपत्ती व्यवस्थापनाचा कायदा २००५ याबद्दल माहिती देणे गरजेचे आहे. त्यामधील तरतुदी कोणत्या आहेत ? या सर्व बाबीं बद्दल कार्यरत शिक्षकांना माहिती देणे गरजेचे आहे, म्हणून संशोधकाने या विषयाचा अभ्यास करण्याचे ठरविले आहे.

**समस्येची गरज व महत्त्व :-**

आपत्ती ही अनेक वेळा शाळेमध्ये घडतात व घडण्याची शक्यता असते. यासाठी शाळेतील शिक्षकांना सेवा पूर्व , सेवांतर्गत प्रशिक्षण देताना आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणाबाबत माहिती देणे गरजेचे आहे.संभाव्य आपत्तीची जाणीव शिक्षकांनी विद्यार्थ्यांना करून देणे महत्त्वाचे आहे. शाळेच्या स्वयंपाक गृहाचा वापर करणाऱ्या स्वयंपाकी , मदतनीस यांना देखील शिक्षकांमार्फत प्रशिक्षित करणे महत्त्वाचे आहे.आपत्ती पूर्वकाळ , आपत्ती काळ आणि आपत्ती नंतर यामध्ये कोणती भूमिका शिक्षकांनी पार पाडावी याचा विचार करणे गरजेचे आहे.परिसरातील नागरिक व पालक यांची कशी मदत घेता येईल ?याबाबतीत गांभीर्याने विचार केल्यास आपत्तीच्या काळात मदत होऊ शकते आणि संभाव्य जीवित आणि वित्तहानी टळू शकते म्हणून या प्रशिक्षणाच्या आवश्यकतेची गरज वाटते.

**कार्यात्मक व्याख्या :-**

सेवांतर्गत - सेवेत कार्यरत असलेले.

शिक्षक- प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावर अध्यापनाचे कार्य करणारे प्राथमिक शिक्षक.

शालेय आपत्ती व्यवस्थापन :- प्राथमिक उच्च प्राथमिक शाळेमध्ये येणाऱ्या आपत्ती टाळणे ,शालेय आपत्ती आराखडा तयार करणे व आपत्तीला तोंड देणे व त्यासाठी योग्य क्षमता मिळवणे म्हणजे शालेय आपत्ती व्यवस्थापन होय.

प्रशिक्षण- शालेय आपत्ती व्यवस्थापन क्षमता व कौशल्य, प्रात्यक्षिक यांचा विकास.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१ शालेय आपत्ती व्यवस्थापनाच्या संकल्पनाचा परिचय करूनदेणे.

२. सेवांतर्गत शिक्षकांना शालेय आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणाच्या गरजेचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके :-**

१. शिक्षकांना शालेय आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिल्यास त्यांच्यामध्ये जाणीव निर्माण होते.

२ .आपत्तीपूर्व व आपत्ती काळ ,आपत्ती नंतर करावयाच्या कार्याची माहिती शिक्षकांना होते.

**परिकल्पना :-**

१. शिक्षकांनी शालेय आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेतल्यास उपाय योजनां बद्दल माहिती मिळते.

२ शालेय आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणाचा शाळा स्तरावर परिणाम होतो.

**संशोधनाची पद्धत:-** संशोधकाने या संशोधनात वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीचा वापर केलेला आहे.

**जनसंख्या :-** चाळीसगाव तालुक्यातील बीट नंबर एक मधील कार्यरत जि. प. प्राथमिक शिक्षक आहेत.

**नमुना निवड:-** प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने यादृच्छिक पद्धतीने शंभर शिक्षकांची निवड केली आहे.

**संशोधनाची साधने :-** शालेय आपत्ती व्यवस्थापनावर आधारित माहिती मिळवण्यासाठी संशोधकांनी प्रश्नावली तयार केलेली आहे.

**सांख्यिकीय साधने :-** या संशोधनात संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन करण्यासाठी शेकडेवारी या साधनाचा वापर केलेला आहे.

**व्याप्ती व मर्यादा :-** सदर संशोधन हे चाळीसगाव तालुक्यातील बीट नंबर एक मधील जि. प. प्राथमिक शिक्षकांसाठी आहे.

**माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन :-**

उद्दिष्टे -१ शालेय आपत्ती व्यवस्थापनाच्या संकल्पनाचा परिचय करून देणे.

| अ.न | प्रश्नावली घटक | नमुना शिक्षक संख्या | होय | नाही |
|---|---|---|---|---|
| १ | आपत्ती संकल्पना | १०० | ३३ | ६७ |

वरील आपत्ती संकल्पना या घटकाचा विचार केला असता १०० पैकी केवळ ३३ % प्राथमिक शिक्षकांना आपत्ती संकल्पना विषयी माहिती आहे,तर ६७ % प्राथमिक शिक्षकांना आपत्ती संकल्पना विषयी माहिती नाही त्यामुळे त्यांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे.

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume I

उद्दिष्टे -२ सेवांतर्गत शिक्षकांना शालेय आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणाच्या गरजेचा अभ्यास करणे.

| अ.न | प्रश्नावली घटक | नमुना शिक्षक संख्या | होय | नाही |
|---|---|---|---|---|
| १ | भौतिक सुविधा | १०० | ४२ | ५८ |
| २ | आपत्ती उपाय योजना | १०० | ३६ | ६४ |
| ३ | आपत्ती व्यवस्थापन | १०० | ३७ | ६३ |
| एकूण | | | ३८.३३ | ६१.६७ |

वरील आपत्ती व्यवस्थापन गरजेच्या घटकाचा विचार केला असता प्राथमिक शाळेतील ३८.३३ %शिक्षकां कडून होय प्रतिसाद मिळाला,तर ६१.६७ % शिक्षकांकडून नाही प्रतिसाद मिळाला,यावरून सेवांतर्गत शिक्षकांना आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणाची गरज आहे.

**निष्कर्ष:-**

1. सेवांतर्गत शिक्षकांना शालेय आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिल्यास त्यांना संकल्पनाचा परिचय होऊन उपाययोजना करता येतील आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची काळजी कशी घ्यावी याबद्दल माहिती मिळते.
2. शालेय आपत्ती व्यवस्थापन आराखडा कसा तयार करावा हे समजेल. विद्यार्थ्यांना आपत्तीच्या समस्येला सामोरे जाण्यासाठी त्यांची मानसिक तयारी कशी करावी हे समजेल.
3. सेवांतर्गत शिक्षकांना आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणाची गरज आहे, त्यासाठी शाळेमध्ये असणाऱ्या भौतिक सुविधा उपलब्ध असण्याची गरज आहे. त्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक देण्याची गरज आहे. त्यानुसार योग्य त्या उपाययोजना करता येतील.

**संदर्भ**

१ माझी शाळा- माझी जबाबदारी, फेब्रुवारी २०२२,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र पुणे.
२ बालकांचे हक्क व सुरक्षितता, मार्च २०२०, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे.
३ नवनियुक्त शिक्षकांचे प्रशिक्षण शिक्षक मार्गदर्शिका सप्टेंबर २०२४, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र पुणे.
४ मुख्याध्यापक मार्गदर्शिका भाग २ फेब्रुवारी २०१३, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण पुणे 30
५ https://dm.mcgm.gov.in/assets/pdf/Final_School_DM_Plan.pdf

©Copyright 2024 ADRJ. All Rights Reserved 